ePaper

**वायनाडमध्ये 2024 सारखीच भीती! बोगद्याच्या बांधकाम स्थळी मोठे भूस्खलन**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™




पान 3 वरुन...

देहू दुमदुमले नामघोषाने; तुकोबांची पालखी पंढरीच्या वाटेवर

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 08 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## उच्च न्यायालयाचा मोदी सरकारला सवाल; बंद खोल्यांची चौकशी होणार?

# 'ताजमहाल' की 'तेजो महालय?'

**महाईन्यूज । कोलकाता**

**आग्रा येथील जागतिक वारसा स्थळ ताजमहाल परिसरात प्राचीन शिवमंदिर असल्याचा दावा करणाऱ्या याचिकेवर अलाहाबाद उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय) आणि प्रकरणातील अन्य प्रतिवादींना जवाबी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच दुसरे प्रतिवादी पंकज कुमार वर्मा यांना नोटीस बजावत १० दिवसांत उत्तर सादर करण्यास सांगितले आहे.**

हे प्रकरण २०१५ पासून आग्रा येथील दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. याचिकाकर्त्यांनी ताजमहालातील बंद खोल्यांचे वैज्ञानिक सर्वेक्षण व अधिकृत छायाचित्रण करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त नियुक्त करण्याची मागणी केली होती. मात्र, दिवाणी न्यायालय आणि त्यानंतर अप्पर जिल्हा न्यायाधीशांनी ही मागणी फेटाळून लावली. या दोन्ही आदेशांना आव्हान देत याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने वरिष्ठ वकील हरी शंकर जैन यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बाजू मांडली.

याचिकाकर्त्यांचा दावा आहे की, ताजमहाल हा मुघलकालीन मकबरा नसून मूळचे हिंदू मंदिर आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार ही वास्तू बाराव्या शतकात राजा परमर्दिदेव यांनी उभारली होती. त्यानंतर ती राजा मानसिंग आणि राजा जयसिंग यांच्या ताब्यात होती. पुढे मुघल सम्राट शाहजहानने ही वास्तू ताब्यात घेऊन तिचे रूपांतर मुमताज महलच्या स्मारकात केले, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांनी ताजमहल परिसरात हिंदू मंदिर असल्याचे १०९ पुरावे असल्याचा दावा केला असून, घुमटावरील कलश, कमळाच्या आकाराची रचना आणि परिसरात गोशाळेचा उल्लेख याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. तसेच एएसआयकडून ताजमहाल परिसरात शुक्रवारी नमाज अदा करण्यास परवानगी दिली जात असल्याचाही उल्लेख याचिकेत करण्यात आला आहे.

दरम्यान, उच्च न्यायालयाने या टप्प्यावर याचिकाकर्त्यांच्या दाव्यांच्या सत्यासत्यतेबाबत कोणतेही मत व्यक्त केलेले नाही. न्यायालयाने केवळ संबंधित पक्षांना उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले असून, त्यानंतर या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार आहे.




### काय आहे याचिकाकर्त्यांची मागणी?

याचिकाकर्त्यांनी ताजमहालातील अनेक वर्षांपासून बंद असलेल्या खोल्यांचे न्यायालयाच्या देखरेखीखाली वैज्ञानिक सर्वेक्षण, अधिकृत छायाचित्रण आणि तज्ज्ञांकडून सविस्तर तपासणी करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, या बंद खोल्यांची आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तपासणी झाल्यास ताजमहालाच्या इतिहासाबाबत करण्यात आलेल्या दाव्यांची वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. यासाठी न्यायालयाने स्वतंत्र न्यायालयीन आयुक्त नियुक्त करून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

### न्यायालयाने दाव्यांवर शिक्कामोर्तब केलेले नाही

अलाहाबाद उच्च न्यायालयाने या टप्प्यावर ताजमहालात प्राचीन शिवमंदिर असल्याच्या दाव्यांवर कोणतेही मत व्यक्त केलेले नाही. न्यायालयाने केवळ केंद्र सरकार, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय) आणि अन्य संबंधित प्रतिवादींना त्यांचे उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे याचिकेत करण्यात आलेले दावे अद्याप न्यायालयाने मान्य केलेले नाहीत किंवा ते सिद्ध झालेले नाहीत. सर्व संबंधित पक्षांची बाजू ऐकल्यानंतरच न्यायालय पुढील सुनावणीदरम्यान या प्रकरणावर निर्णय घेणार आहे.



### २०१५ पासून न्यायालयात प्रलंबित

ताजमहल परिसरात प्राचीन हिंदू मंदिर असल्याच्या दाव्याशी संबंधित हे प्रकरण २०१५ पासून आग्रा येथील दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. याचिकाकर्त्यांनी सुरुवातीपासूनच ताजमहालातील बंद खोल्यांचे वैज्ञानिक सर्वेक्षण करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त नियुक्त करण्याची मागणी केली होती. मात्र, दिवाणी न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली. त्यानंतर अप्पर जिल्हा न्यायाधीशांकडे केलेले अपीलही नामंजूर झाले. या दोन्ही निर्णयांना आव्हान देत आता याचिकाकर्त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

### याचिकाकर्त्यांचा दावा नेमका काय?

याचिकाकर्त्यांच्या मते, ताजमहाल हा मुघलकालीन मकबरा नसून मूळची हिंदू वास्तू आहे. त्यांचा दावा आहे की, ही वास्तू बाराव्या शतकात राजा परमर्दिदेव यांनी उभारली होती. त्यानंतर ती राजा मानसिंग आणि राजा जयसिंग यांच्या ताब्यात होती. पुढे शाहजहानने ही वास्तू ताब्यात घेऊन तिचे मुमताज महलच्या स्मारकात रूपांतर केले. याचिकेत घुमटावरील कलश, कमळाच्या आकाराची रचना, बंद खोल्या आणि इतर स्थापत्य वैशिष्ट्यांचा उल्लेख करत एकूण १०९ पुरावे असल्याचा दावा करण्यात आला आहे. या दाव्यांची सत्यता मात्र अद्याप न्यायालय किंवा भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय) यांनी मान्य केलेली नाही.

# कळमोडी धरण चौथ्या वर्षीही 100% भरले

## सांडव्यातून ६,७५९ क्युसेक्स विसर्ग; धरणात १.५ टीएमसी जलसाठा



**महाईन्यूज । पुणे**

**खेड तालुक्यातील पश्चिम व पूर्व पट्टा तसेच आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठारासाठी जीवनदायिनी ठरलेले कळमोडी धरण सोमवारी (दि.६) रात्री शंभर टक्के भरले. धरण पूर्ण क्षमतेने भरताच सांडव्यातून ६,७५९ क्युसेक्स वेगाने विसर्ग आरळा नदीपात्रात सुरू झाला आहे. याबाबत धरण प्रशासनाचे उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांनी माहिती दिली.**

विशेष म्हणजे, सलग चौथ्या वर्षी कळमोडी धरण शंभर टक्के भरले आहे. यामुळे खेडच्या पश्चिम भागातील नागरिक, शेतकरी आणि पाणीपुरवठा योजनांवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा धरणात ४२.८७ दशलक्ष घनमीटर (१.५१४ टीएमसी) इतका जलसाठा झाला आहे. सन २०१० पासून कळमोडी धरण पूर्ण क्षमतेने भरू लागले आहे.

या धरणाला कोणत्याही प्रकारचे दरवाजे नाहीत. त्यामुळे धरण भरताच सांडव्यातून आपोआप पाण्याचा विसर्ग सुरू होतो. धरण परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे जलसाठ्यात झपाट्याने वाढ झाली.

१ जूनपासून धरण क्षेत्रात ५२६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. गतवर्षी कळमोडी धरण २४ जून रोजी भरले होते. तर यंदा ते ११ दिवस उशिराने ६ जुलै रोजी पूर्ण क्षमतेने भरले. धरण भरल्यामुळे चासकमान धरणाच्या जलसाठ्यातही वाढ होण्यास मदत होणार आहे.

कळमोडी प्रकल्पामुळे चिखलगाव, साकुर्डी, देवोशी, कुडे, बांगरवाडी, येनिये, घोटवडी यांसह अनेक गावांना मोठ्या प्रमाणावर सिंचनाचा लाभ होतो. तसेच पश्चिम भागातील अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना या धरणावर अवलंबून असल्याने पिण्याच्या पाण्याची चिंता दूर झाली आहे. धरण भरल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण असून खरीप हंगामासाठीही मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, धरण परिसरातील दगडी साठा तातडीने बाहेर काढावा तसेच चिखलगाव-डामसे वस्ती येथे पुलकम बंधारा उभारावा, अशी मागणी कळमोडी प्रकल्प संघर्ष समितीचे अध्यक्ष व माजी सरपंच बाळासाहेब गोपाळे आणि ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात आहे. यंदा चासकमान धरणात ३६.१४ टक्के जलसाठा असून, गतवर्षी याच कालावधीत तो ७८.६४ टक्के होता. तर भामा आसखेड धरणात ५३.३५ टक्के जलसाठा असून, गतवर्षी तो ५७.८१ टक्के होता. धरण क्षेत्रातील पावसाचा जोर कायम राहिल्यास ही धरणेही लवकरच पूर्ण क्षमतेने भरतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास आगामी काळात परिसरातील जलस्रोत अधिक समृद्ध होऊन शेती, पिण्याचे पाणी आणि सिंचन व्यवस्थेला मोठा आधार मिळणार आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम अधिक सक्षम होण्याची आशा व्यक्त केली जात असून, शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### ग्रामस्थांनी सतर्क रहावे

आरळा नदीपात्रालगतच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीपात्रातील शेतीची अवजारे, साहित्य तसेच जनावरे तातडीने सुरक्षित स्थळी हलवावीत. नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, असे आवाहन धरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## पुण्यात खडकवासला परिसरात मुसळधार पाऊस! महापालिकेने नागरिकांचे केले स्थलांतर

**महाईन्यूज । पुणे**

**शहराच्या सर्वच भागात गेल्या २४ तासांपेक्षा अधिक काळ पडलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. अनेक भागांत पावसाळी गटारांचे तसेच ड्रेनेजचे पाणी साचणे, झाडांच्या फांद्या पडणे, पूरस्थिती निर्माण झाली. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण साखळीतील खडकवासला परिसरात सर्वाधिक ११५.२० मिमी पावसाची नोंद झाली असून कोंढवा-येवलेवाडी भागात ७७.२० मिमी, वानवडी-रामटेकडी (७३ मिमी), नगररोड-वडगाव शेरी (७६ मिमी) इतक्या पावसाची नोंद झाली.**



सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे विविध भागात पुराचे पाणी शिरले असून आवश्यक ती काळजी घेण्यासाठी महापालिका यंत्रणा सज्ज झाली आहे. अचानकपणे सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे पोराचा धोका निर्माण झाला असून सुरक्षिततेच्या कारणास्तव सुरक्षित ठिकाणी हलविले जात आहे. आत्तापर्यंत महापालिका प्रशासनाने शहरातील विविध भागांमधून २६० कुटुंबातील तब्बल १०४० नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे.

पुराचे पाणी घुसलेल्या वस्त्यांमधील नागरिकांचे स्थलांतर केले जात आहे. यामध्ये येरवडा, वडगाव शेरी, घोरपडी, बोपोडी आणि शिवाजीनगर परिसरातील पुरग्रस्त नागरिकांना महानगरपालिकेने शाळा व समाजमंदिरांमध्ये तात्पुरता निवारा उपलब्ध करून दिला आहे. शहरात पावसाला सुरुवात झाल्यापासून महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे ६३ तक्रारी प्राप्त झाल्या.

त्यामध्ये २१ ठिकाणी पाणी साचल्याच्या, १८ ठिकाणी झाडे किंवा फांद्या पडल्याच्या तसेच भिंत कोसळण्याच्या चार घटना नोंदविण्यात आल्या. सोमवार पहाटे पेठ-धनगर गल्ली तसेच अशोक चौक-नाना पेठ येथे वाडा पडल्याच्या घटनाही घडल्या. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. पुणे महानगरपालिका, हवामान विभाग तसेच जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे नागरिकांनी पालन करावे.

### व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत

शहरात पडत असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत ठेवला असून सर्व क्षेत्रीय कार्यालये, अग्निशमन दल, जलनिस्सारण, पथ, विद्युत व इतर विभागांमध्ये समन्वय साधून तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यात येत आहे. महापालिकेने ४९ ठिकाणी मदत केंद्रे उभारली आहेत. यासाठी हजारो कर्मचारी, जेसीबी, पंप, कॉम्पॅक्टर, टिपर, बिन लिफ्टर, फॉगिंग मशीन, पाण्याचे टँकर आदी यंत्रसामग्री सज्ज ठेवण्यात आली आहे.

# देहू दुमदुमले नामघोषाने; तुकोबांची पालखी पंढरीच्या वाटेवर

## ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात ३४१ व्या पालखी सोहळ्याला उत्साहात प्रारंभ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि अभंगांच्या स्वरांनी दुमदुमलेल्या देहूनगरीतून जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या पालखी सोहळ्याचे मंगळवारी दुपारी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे विधिवत प्रस्थान झाले. हजारो वारकऱ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यामुळे संपूर्ण देहू भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. पालखीचा पहिला मुक्काम देहूतील इनामदार वाड्यात होणार असून बुधवारी सकाळी पालखी पिंपरी-चिंचवडकडे मार्गस्थ होईल.**




प्रस्थान सोहळ्याची सुरुवात पहाटे पाच वाजल्यापासून विविध धार्मिक विधींनी झाली. शिळा मंदिर आणि तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिरात विश्वस्तांच्या वतीने महापूजा करण्यात आली. त्यानंतर इनामदार वाड्यात संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन झाले. सकाळी दहा ते दुपारी बारा या वेळेत देहूकर महाराजांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले.

दुपारी साडेदोनच्या सुमारास इनामदार वाड्यातून महाराजांच्या पादुका देऊळवाड्यातील भजनी मंडपात आणण्यात आल्या. ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात चांदीच्या सिंहासनावर विराजमान असलेल्या चांदीच्या पादुकांना अभिषेक करून विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे, आमदार सुनील शेळके आणि आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते पादुकांचे पूजन करण्यात आले.

दुपारी ४ वाजून २ मिनिटांनी संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले. सायंकाळी पालखीने देहूची प्रदक्षिणा पूर्ण करून इनामदार वाड्याकडे प्रस्थान केले. तेथे रात्रीचा मुक्काम होणार असून बुधवारी सकाळी पालखी पिंपरी-चिंचवडच्या दिशेने पुढील प्रवासाला सुरुवात करणार आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून पुणे जिल्हा, मावळ, देहू आणि आळंदी परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला महापूर आला होता. नदीवरील अनेक पूल पाण्याखाली गेल्याने जिल्हा प्रशासन आणि देवस्थान संस्थानांनी वारकऱ्यांना देहू व आळंदी येथे गर्दी टाळण्याचे आवाहन केले होते. मात्र मंगळवारी सकाळपासून पावसाने विश्रांती घेतल्याने मोठ्या संख्येने वारकरी देहूत दाखल झाले आणि भक्तिमय वातावरणात पालखी प्रस्थान सोहळा उत्साहात पार पडला.

### वारकरी संप्रदायाचा अखंड भक्तीप्रवास

संत तुकाराम महाराजांची पालखी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक मानली जाते. शेकडो दिंड्या, लाखो वारकरी आणि "ज्ञानोबा-तुकोबा"च्या अखंड जयघोषात दरवर्षी निघणारी ही आषाढी वारी भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश देत पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करते. यंदा ३४१ व्या पालखी सोहळ्याला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून देहूनगरी पुन्हा एकदा भक्तिरसात न्हाऊन निघाली आहे.

# मुसळधार पावसातही डॉ. सुहास कांबळे यांची तत्पर लोकसेवा..!




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे–नाशिक महामार्गावर साधुराम गार्डन मंगल कार्यालय समोरील परिसरात मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. महामार्गावर पाणी साचून वाहतूक विस्कळीत झाल्याने वाहनचालकांसह नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. परिस्थितीची माहिती मिळताच नगरसेवक व शहर सुधारणा समिती सदस्य डॉ. सुहास कांबळे यांनी तातडीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधत प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेतली.**

गेल्या दोन दिवसांपासून पुणे जिल्ह्यासह मावळ, देहू आणि आळंदी परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत आहे. नदीच्या वाढत्या पाणीपातळीमुळे आळंदी आणि देहू परिसरातील अनेक पूल पाण्याखाली गेले असून प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक बंद केली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दिंडी प्रमुखांच्या माध्यमातून वारकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवण्यात येत आहे.

दरम्यान, पालखी सोहळ्यासाठी आधीच देहू आणि आळंदीत दाखल झालेल्या अनेक वारकऱ्यांना पावसाचा फटका बसला आहे. आळंदीतील भक्तनिवास परिसरात पुराचे पाणी शिरल्याने सिद्धबेट, ज्ञानेश्वरी मंदिर परिसर, इंद्रायणीनगरी, ठाकूरबुवा मंडप आणि गोपाळपुरा येथील भाविकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान मंगळवारी (७ जुलै) नियोजित असून पहाटेपासून धार्मिक विधी सुरू होतील. दुपारी इनामदार वाड्यातून पालखी प्रस्थान करेल आणि रात्री त्याच ठिकाणी मुक्काम असेल. बुधवारी (८ जुलै) संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून तुकोबांची पालखी आकुर्डी येथे मुक्कामी पोहोचणार आहे. सध्याची पूरस्थिती लक्षात घेऊन प्रस्थान सोहळा प्रतिकात्मक स्वरूपात पार पडणार असल्याचे संस्थानकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### युद्धपातळीवर मदतकार्य सुरू

अतिवृष्टीमुळे प्रभाग क्रमांक ८ मधील अनेक भागांत पाणी साचणे, नाले तुंबणे आणि रस्त्यांवर चिखल होण्याच्या घटना घडल्या. या पार्श्वभूमीवर डॉ. सुहास कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या पथकांकडून गेल्या दोन दिवसांपासून पाणी निचरा, नाल्यांची साफसफाई आणि नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

> आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना अतिवृष्टीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांची सुरक्षितता आणि दैनंदिन जीवन सुरळीत ठेवणे हेच आमचे प्रथम कर्तव्य आहे. समस्या कागदावर न ठेवता प्रत्यक्ष मैदानात उतरून तातडीने त्या सोडवण्यावर आमचा भर आहे. प्रभाग 8 सह पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक नागरिकाला दिलासा मिळेपर्यंत मी आणि माझ्या टीमची सेवा अखंड सुरू राहील. - डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, शहर सुधारणा समिती सदस्य, पिं. चिं. मनपा

### तातडीच्या कारवाईमुळे वाहतूक सुरळीत

पुणे–नाशिक महामार्गावरील साधुराम गार्डन परिसरात पावसामुळे साचलेल्या पाण्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. माहिती मिळताच महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून जेसीबीच्या सहाय्याने नाल्याची साफसफाई, चेंबर होल उघडून पाण्याचा निचरा आणि रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्याची तातडीची कारवाई करण्यात आली. या जलद उपाययोजनांमुळे काही वेळातच महामार्गावरील पाणी ओसरले आणि वाहतूक पूर्ववत सुरू झाली.



## भूमिका

**मुंबईसह मुंबई महानगर प्रदेशातील प्रत्येक पावसाळा हा नागरिकांसाठी भीतीचा विषय बनला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही पहिल्याच पावसात रस्ते जलमय होतात, नाले तुंबतात, उघड्या मॅनहोलमध्ये नागरिक वाहून जातात आणि झाडे कोसळून निष्पापांचे जीव जातात.**

# नालेसफाईवर हजारो कोटी; तरीही व्यवस्था तुंबलेलीच!



यामागे केवळ नैसर्गिक आपत्ती नसून प्रशासनातील निष्काळजीपणा, भ्रष्टाचार आणि लोकप्रतिनिधींची उदासीनता हेच खरे कारण आहे.

सन २०२१ ते २०२६ या पाच वर्षांत मुंबईत नालेसफाईवर तब्बल १,७०० कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा केला जातो. एवढा खर्च करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा दिसत नाही.

गाळ काढल्याची कागदोपत्री नोंद, कंत्राटदारांना दिलेली बिले आणि प्रत्यक्षात तुंबलेले नाले हा विरोधाभास गंभीर आहे. हेच चित्र नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर आणि वसई-विरारमध्येही दिसते. उच्च न्यायालयालाही खड्डे, उघडे मॅनहोल आणि निकृष्ट नागरी सुविधांवर प्रशासनाला फटकारावे लागणे ही लोकप्रतिनिधींसाठी लाजिरवाणी बाब आहे.

नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ अधिकाऱ्यांची नसून आमदार, नगरसेवक आणि संबंधित लोकप्रतिनिधींचीही आहे. पावसात रेनकोट घालून फोटो काढण्यापेक्षा पावसापूर्वी नाले, मॅनहोल, झाडे आणि रस्त्यांची पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासणे अधिक महत्त्वाचे आहे.

कंत्राटदार, अधिकारी आणि काही लोकप्रतिनिधी यांचे साटेलोटे असल्याची भावना जनतेमध्ये दिवसेंदिवस बळावत आहे. एखादी दुर्घटना घडली की चौकशी समिती नेमली जाते, अहवाल तयार होतो आणि काही दिवसांत सर्व काही विसरले जाते. दोषींवर कठोर कारवाई होत नसल्याने हे दुष्टचक्र कायम सुरू राहते.

त्यामुळे नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी होत आहे. या परिस्थितीत केवळ आरोप-प्रत्यारोप करून चालणार नाही. नालेसफाई, रस्ते, मॅनहोल आणि इतर नागरी कामांचे जीपीएस-आधारित डिजिटल निरीक्षण, खर्चाची श्वेतपत्रिका आणि कंत्राटदारांच्या कामाचे सार्वजनिक लेखापरीक्षण अनिवार्य केले पाहिजे. कामात हलगर्जीपणा आढळल्यास अधिकारी, कंत्राटदार आणि संबंधित लोकप्रतिनिधींना समान जबाबदार धरले पाहिजे.

मुंबईतील नागरिक पावसामुळे कमी आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे अधिक बळी पडत आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. शहराचा विकास फक्त मोठ्या प्रकल्पांनी होत नाही; सुरक्षित रस्ते, स्वच्छ नाले आणि जबाबदार प्रशासन यावरच खऱ्या अर्थाने महानगराची ओळख ठरते.

लोकप्रतिनिधींनी प्रसिद्धीपेक्षा प्रामाणिकपणाला प्राधान्य दिले, तरच नागरिकांचा विश्वास परत मिळवता येईल. अन्यथा प्रत्येक पावसाळ्यानंतर अभिनंदन नव्हे, तर अपयशाचीच पुनरावृत्ती होत राहील.

## प्रासंगिक »

### वाईट सवयींचा त्याग

**एक व्यापारी अत्यंत प्रामाणिक, नम्र आणि मनमिळाऊ होता; पण त्याचा मुलगा उद्धट आणि गर्विष्ठ होता. मुलाला सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करूनही यश आले नाही.**

शेवटी व्यापाऱ्याने त्याला आपल्या मित्राकडे काही दिवसांसाठी पाठवले. एके दिवशी मित्र त्याला बागेत घेऊन गेला. प्रथम त्याने लहान रोप उपटायला सांगितले. मुलाने ते सहज उपटले. नंतर मोठे रोप उपटण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. शेवटी एका मोठ्या वृक्षाकडे बोट दाखवत तो उपटण्यास सांगितले. मुलाने ते अशक्य असल्याचे सांगितले. त्यावर मित्र म्हणाले, "वाईट सवयींचेही असेच असते.

सुरुवातीला त्या सहज सोडता येतात; पण त्या मनात खोलवर रुजल्या की त्यांचा त्याग करणे अत्यंत कठीण होते." हा संदेश मुलाच्या मनाला भिडला. त्याने आपल्या उद्धट वागण्याचा त्याग करून नम्र, विनम्र आणि सुस्वभावी होण्याचा निश्चय केला. काही दिवसांत त्याच्या स्वभावात सकारात्मक बदल झाला आणि तो सर्वांचा लाडका बनला.

- तात्पर्य : वाईट सवयी सुरुवातीलाच सोडल्या तरच जीवन सुखी, यशस्वी आणि सुसंस्कृत बनते.

पावसाळा सुरू झाला की मुंबईसह राज्यातील प्रमुख महानगरांचे जनजीवन विस्कळीत होणे ही जणू नित्याची बाब झाली आहे. रस्ते खचणे, नाले तुंबणे, खड्डे पडणे, वाहतूक ठप्प होणे आणि नागरिकांचे हाल होणे यासाठी केवळ मुसळधार पावसाला दोष देऊन चालणार नाही.

# महानगरांना पावसापेक्षा भ्रष्टाचाराचा धोका अधिक



ही परिस्थिती वर्षानुवर्षे कायम राहण्यामागे भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाची कामे आणि प्रशासनाची निष्काळजी वृत्ती हेच मुख्य कारण आहे.

मुंबई महानगर क्षेत्रातील नऊ महापालिका तसेच पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांचा वार्षिक अर्थसंकल्प सव्वालाख कोटी रुपयांहून अधिक आहे. एवढा निधी उपलब्ध असूनही नागरिकांना दर्जेदार रस्ते, स्वच्छ नाले, सुरक्षित पादचारी मार्ग आणि मूलभूत सुविधा मिळत नाहीत. यावरून पैशांची नव्हे, तर प्रामाणिक अंमलबजावणीची कमतरता असल्याचे स्पष्ट होते. मान्सूनपूर्व नालेसफाई, रस्त्यांची दुरुस्ती आणि झाडांच्या छाटणीवर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होतात.

मात्र पहिल्याच पावसात सर्व दावे फोल ठरतात. कोस्टल रोड, अटल सेतू किंवा इतर महत्त्वाच्या प्रकल्पांवर मोठा खर्च करूनही काही महिन्यांत खड्डे, तडे किंवा इतर दोष समोर येतात.

यामुळे सार्वजनिक पैशांचा अपव्यय तर होतोच, पण नागरिकांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. या परिस्थितीसाठी केवळ ठेकेदार नव्हे, तर संबंधित अधिकारी आणि कामावर देखरेख करणारी यंत्रणाही तितकीच जबाबदार आहे. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकणे, दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि सर्व कामांचे स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण करणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक निधीचा प्रत्येक रुपया नागरिकांच्या हितासाठी खर्च झाला पाहिजे. सरकारच्या चांगल्या योजना भ्रष्टाचारामुळे बदनाम होत असतील, तर त्याचा फटका शेवटी जनतेलाच बसतो. नागरिक कर भरतात तो विकासासाठी, निकृष्ट कामांची किंमत मोजण्यासाठी नव्हे.

त्यामुळे पारदर्शक कारभार, कठोर उत्तरदायित्व आणि गुणवत्तेला प्राधान्य देणारी व्यवस्था उभी राहिली, तरच महानगरांचा खरा विकास होईल. अन्यथा प्रत्येक पावसाळ्यात पूर येईल तो पाण्याचा नव्हे, तर भ्रष्टाचाराचाच.

## ।। अभंगवाणी ।।



देवापाशीं मागें आवडीची भक्ति ।
विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥२॥

तुका म्हणे मना सांगतों विचार ।
धरावा निर्धार दिसेंदिस ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शरद पवार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत?

## म्हणून फडणवीसांनी ढगफुटीची अफवा पसरवली; काँग्रेसचा आरोप

**महाईन्यूज । मुंबई**

**शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली... मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकमध्ये ढगफुटी होणार असल्याची अफवा पसरवली, असा सनसनाटी आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षांनी केला... भाजपाच्या रॅलीत हनुमानाच्या वेषात एक व्यक्ती नाचत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आमदार आदित्य ठाकरेंनी टीकेची झोड उठवली.**



मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून सरकारी योजनेतील घरे लाटण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला... अतिवृष्टीमुळे राज्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे प्रशासनाला निर्देश देण्यात आल्याची माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली...

अयोध्येतील श्रीराम मंदिरात झालेल्या दान चोरी प्रकरणाच्या विरोधात नाशिकच्या पंचवटी येथील प्रसिद्ध काळाराम मंदिराबाहेर काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यासह परिसरातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला होता. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केला. आमचे आंदोलन आंदोलन चिरडले जावे आणि लोकांनी आंदोलनाला येऊ नये, म्हणून फडणवीस यांनी नाशिकमध्ये ढगफुटीची अफवा पसरवली. कुठलाही धोका नसताना त्र्यंबकेश्वरमध्ये ढगफुटी होणार असल्याचा फुगवटा तयार करण्यात आला, असा आरोप सपकाळ यांनी केला. फडणवीस यांचा कारभार सुलतानी असून त्यांना शेतकऱ्यांशी काहीही देणे-घेणे नाही. सध्या ते फोडाफोडीत व्यस्त असल्याची टीकाही सपकाळ यांनी केली. त्यांच्या या टीकेवर आता भाजपाकडून काय प्रतिक्रिया दिली जाणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. मात्र, शरद पवार यांच्या कन्या व खासदार सुप्रिया सुळे यांनी या सर्व चर्चांनी खंडन केले. सध्या ज्या काही चर्चा सुरू आहेत, त्याची मला गंमत वाटते, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. त्यामुळे शरद पवार हे भाजपाबरोबर जाणार असल्याच्या अफवांना सध्यातरी पूर्णविराम मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नावाने बनावट कागदपत्रे तयार करून रमाई आवास योजनेतील घरे लाटण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे विधानपरिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी केला.

### शरद पवार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत?

राजकारणात कधी काय होईल याचा अंदाज बांधणे कठीण असते. गेल्या महिन्यात ठाकरे गटातील सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यानंतर ठाकरे गटाचे विधानपरिषदेचे आमदार सचिन अहिर यांनीही शिंदे गटाची कास धरली. यादरम्यान ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. त्यातच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपाचे विनोद तावडे यांच्यात गुप्त बैठक झाल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिल्याने या चर्चांनी आणखीनच जोर पकडला.

### आदित्य ठाकरे यांचा भाजपावर तीव्र संताप

अयोध्येतील राम मंदिरातील देगणीत झालेल्या अपहाराच्या मुद्द्यावरून वादंग उठला असतानाच भाजपाच्या लखनौ येथील रॅलीतील एक व्हिडिओ समाजमाध्यमांवर वाऱ्याच्या वेगाने व्हायरल झाला. या व्हिडिओत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या स्वागतासाठी एक व्यक्ती हनुमानाच्या वेषात नाचत असल्याचे दिसून आले. त्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी भाजपावर तीव्र संताप व्यक्त केला. हनुमानाच्या वेषातील व्यक्तीला भाजपचा झेंडा हातात घेऊन भाजपा अध्यक्षांच्या स्वागतासाठी नाचायला लावले हे पाहून धक्का बसला आहे. सरकारने नेमलेल्या विश्वस्तांनी अयोध्येतील राम मंदिराची जी लूट केली आहे, त्यावर भाजप इतकी शांत कशी काय आहे.

# खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण ठेवणारा स्वतंत्र कायदा पुढील अधिवेशनात

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील खासगी शिकवणी वर्गाच्या मनमानीवर लगाम घालण्यासाठी राज्य सरकार स्वतंत्र कायदा आणण्याच्या तयारीत असून 'खासगी शिकवणी वर्ग नोंदणी व विनियमन अधिनियम, २०२६' तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली.**



विधान परिषदेचे आमदार मनिषा कायंदे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना भुसे यांनी राज्यातील खासगी शिकवणी वर्गांवर सरकारच्या वतीने नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा करीत असल्याचे सांगितले. जानेवारी २०२४ मध्ये केंद्र सरकारने कोचिंग संस्थांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्या नियमांचा तसेच इतर राज्यांतील कायद्यांचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी स्वतंत्र नियमावली तयार केली जात आहे. या कायद्याअंतर्गत खासगी क्लासेसची अनिवार्य नोंदणी, उपलब्ध सुविधा, वर्गांच्या वेळा, शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, जाहिरातींचे निकष आणि विद्यार्थी-पालकांना दिल्या जाणाऱ्या माहितीचे नियमन करण्यात येणार आहे.

लक्षवेधी मांडताना आमदार कायंदे यांनी अनेक कोचिंग क्लासेसकडून खोट्या यशोगाथा, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि निकालांचा चुकीचा वापर करून विद्यार्थी व पालकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप केला. राज्यात अशा संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा नसल्याने त्याचा गैरफायदा घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण आणि स्पर्धेचा दबाव कमी करण्यासाठी समुपदेशनासह संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचीही मागणी त्यांनी केली.

यावर उत्तर देताना शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राज्य सरकार विद्यार्थी आणि पालकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. कोचिंग क्लासेसमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणण्यासाठी सर्वंकष कायदेशीर चौकट तयार केली जात असून, हिवाळी अधिवेशनात हा कायदा सभागृहासमोर मांडला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### मोटेगावकर वर पेपर फुटी प्रकरणात कारवाई

राज्यात एका मोटेगावकर वर पेपर फुटी प्रकरणात कारवाई होते पण राज्यात असे शेकडो मोटेगावकर आजही खासगी शिकवणी वर्ग घेत आहेत असे जगन्नाथ अभ्यंकर यांनी आरोप केला. आम्हाला साधी वाढदिवसाची जाहिरात टीव्हीवर करणे परवडत नाही पण हे खासगी शिकवणी वर्ग वाले कोट्यवधी रुपयांची दिवसभर जाहिरात करत असल्याचे इंद्रिस नायकवडी यांनी सांगितले.

# वायनाडमध्ये दरड कोसळली

## कल्लाडी येथील दोन कामगारांचा मृत्यू, अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती!

**महाईन्यूज । केरळ**

**केरळमधील वायनाड जिल्ह्यात मंगळवारी मुसळधार पावसामुळे एक मोठी दुर्घटना घडली आहे. बोगद्याचे काम सुरू असतानाच कामाजवळ भीषण दरड कोसळली असून, यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर परिसरात युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले असून, अजूनही अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



मल्लपुरम आणि वायनाड जिल्ह्याला जोडणाऱ्या 'अनाक्कमपोईल-मेप्पाडी बोगदा रस्ता' प्रकल्पाचे काम सुरू असलेल्या कल्लाडी येथील मीनाक्षी पुलाजवळ ही घटना घडली. दरड कोसळली तेव्हा घटनास्थळावर अनेक बांधकाम कामगार उपस्थित होते.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि काही लोकांना सुखरूप बाहेर काढले. सध्या ढिगाऱ्याखाली सुमारे १० जण अडकल्याची भीती अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. तर अपघातात जखमी झालेल्या ६ जणांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अग्निशामक दल आणि आपत्ती निवारण पथक घटनास्थळी पोहोचले असून, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे जवानही बचावकार्यात सामील झाले आहेत. केरळचे महसूल मंत्री ए. पी. अनिल कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, एनडीआरएफच्या ३० जवानांचे पथक घटनास्थळी पोहोचले असून मदतकार्य वेगाने सुरू आहे.

गेल्या २४ तासांत या भागात तब्बल २६५ मिमी इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. सतत कोसळणाऱ्या या मुसळधार पावसामुळेच ही दरड कोसळल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. या दुर्घटनेत बोगद्याच्या कामावरील कामगारांची वाहतूक करणारी काही वाहनेही ढिगाऱ्याखाली दबून पूर्णपणे चक्काचूर झाली आहेत.

या भीषण दुर्घटनेनंतर केरळचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीसन यांनी तातडीने कृषिमंत्री टी. सिद्दीकी यांच्यासोबत एक आपत्कालीन बैठक घेतली. मुख्यमंत्र्यांनी सर्व यंत्रणांना युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मंत्री ए. पी. अनिल कुमार आणि मंत्री सिद्दीकी यांना तात्काळ वायनाडला रवाना होऊन प्रत्यक्ष बचावकार्यावर देखरेख ठेवण्यास सांगितले आहे.

मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हाधिकारी आणि आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने २० जून रोजीच बांधकाम साईटवरील माती हटवण्याचे आदेश कंत्राटदाराला दिले होते, मात्र या आदेशाचे पालन न केल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

दरम्यान, या दुर्घटनेवरून आता राजकीय वातावरणही तापण्याची शक्यता आहे. केरळचे मंत्री टी. सिद्दीकी यांनी हा अपघात म्हणजे प्रशासकीय निष्काळजीपणाचा फटका असल्याचे सांगत ही "मानवनिर्मित आपत्ती" असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

### वायनाडसाठी 'रेड अलर्ट'

भारतीय हवामान विभागाने वायनाड जिल्ह्यासाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे. जिल्ह्यातील मानंथावडी आणि वायथिरी भागात अत्यंत मुसळधार पाऊस सुरू आहे. याशिवाय शेजारील कोझिकोड जिल्ह्यालाही रेड अलर्ट देण्यात आला आहे, तर मल्लपुरम, कन्नूर आणि कासारगोड जिल्ह्यांमध्ये 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या निकषानुसार, २४ तासांत २०४ मिमीपेक्षा जास्त पाऊस झाल्यास रेड अलर्ट जारी केला जातो.

## भारत-इंडोनेशिया मैत्रीचे नवे पर्व; पंतप्रधान मोदींचा सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरव!

**महाईन्यूज । इंडोनेशिया**

**भारत आणि इंडोनेशिया या दोन देशांमधील धोरणात्मक आणि राजनैतिक संबंधांनी आज एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. संरक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य आणि व्यापार अशा विविध क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांनी अनेक महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षरी केली आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा ठरला तो जगातील सर्वात वेगवान क्रूझ क्षेपणास्त्र असलेल्या 'ब्रह्मोस' खरेदीचा करार! या करारामुळे दोन्ही देशांच्या संरक्षण क्षेत्रातील भागीदारीला मोठी ताकद मिळाली आहे.**



### पंतप्रधान मोदींचा 'जकार्ता'त अभूतपूर्व सन्मान

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या तीन देशांच्या अधिकृत दौऱ्यावर असून, त्यांचा हा इंडोनेशिया दौरा अत्यंत यशस्वी ठरला आहे. जकार्ता येथील राष्ट्रपती भवनात पार पडलेल्या एका भव्य शासकीय सोहळ्यात पंतप्रधानांना हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान प्रदान करताना राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो म्हणाले,"इंडो-पॅसिफिक क्षेत्रात शांतता आणि स्थिरता राखण्यासाठी भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पंतप्रधान मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळेच आज दोन्ही देशांमधील संबंध एका नव्या उंचीवर पोहोचले आहेत.

या ऐतिहासिक भेटीदरम्यान इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना इंडोनेशियाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'बिंगतांग आदिपूर्णा' प्रदान करून त्यांचा गौरव केला.

हा आमच्या प्रजासत्ताकाचा सर्वोच्च सन्मान असून, तो भारत आणि इंडोनेशियामधील प्राचीन सांस्कृतिक ऋणानुबंध आणि अतूट विश्वासाचे प्रतीक आहे."

पंतप्रधान मोदींनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारताना, हा गौरव १४० कोटी भारतीयांचा असल्याचे सांगत इंडोनेशियाचे राष्ट्रपती आणि जनतेचे आभार मानले. पंतप्रधान मोदींचे इंडोनेशियाच्या भूमीवर आगमन होताच त्यांचे अत्यंत अभूतपूर्व आणि राजेशाही थाटात स्वागत करण्यात आले.

जकार्ता येथील आपले सर्व कार्यक्रम आटोपल्यानंतर आणि योग्याकर्ता येथील ऐतिहासिक 'प्रंबनन हिंदू मंदिर' संकुलाला भेट दिल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बेनीज यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करण्यासाठी मेलबर्नकडे रवाना होतील.

पंतप्रधान मोदींचे विमान इंडोनेशियाच्या हवाई हद्दीत प्रवेश करताच, इंडोनेशियाच्या हवाई दलाच्या 'एफ-१६' आणि 'सुखोई' लढाऊ विमानांनी त्यांच्या विमानाला हवेतच वेढा घालत सुरक्षा आणि विशेष मानवंदना दिली. सर्व प्रोटोकॉल बाजूला सारत राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो स्वतः पंतप्रधानांच्या स्वागतासाठी विमानाच्या पायऱ्यांशी उपस्थित होते. त्यांनी मोदींना कडकडून मिठी मारली. यावेळी ६ तोफांच्या सलामीनं जकार्ताचा परिसर दणाणून गेला होता. राष्ट्रपती भवनात पारंपरिक पद्धतीने घोडदळ आणि लष्कराच्या तुकडीने पंतप्रधानांना 'गार्ड ऑफ ऑनर' दिला.

इंडोनेशिया भारताकडून 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र यंत्रणा खरेदी करणार आहे. यासोबतच भारताची 'भारत डायनॅमिक्स लिमिटेड' (BDL) आणि इंडोनेशियाची 'रिपब्लिकॉर्प' यांच्यात हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांबाबत महत्त्वपूर्ण करार झाला. भारताची सरकारी कंपनी 'सेल' आणि इंडोनेशियाच्या 'पीटी क्रॅकाटाऊ स्टील' यांच्यात स्टील पुरवठा साखळीसाठी संयुक्त भागीदारी जाहीर करण्यात आली.



# स्वत:लाच दिलेली सर्वात मोठी भेट

बॉ लिवूड अभिनेत्री कृति सेनन (Kriti Sanon ) हिने तिच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित एक महत्त्वाचा खुलासा करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. एका पॉडकास्टमध्ये बोलताना कृतीने काही वर्षांपूर्वी तिने एग फ्रीझिंग (Egg Freezing) केल्याचे सांगितले. हा निर्णय तिने तिच्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या मिमी या चित्रपटाच्या तयारीदरम्यान घेतल्याचेही तिने स्पष्ट केले. करिश्मा मेहता यांच्या पॉडकास्टमध्ये कृतिने या निर्णयामागील कारण सविस्तर सांगितले. ती म्हणाली की, 'मिमी' या चित्रपटासाठी तिला भूमिकेच्या गरजेनुसार वजन वाढवावे लागणार होते. त्याच काळात एग फ्रीझिंग करण्याची योग्य वेळ असल्याचे तिला वाटले. कारण या प्रक्रियेदरम्यान हार्मोनल इंजेक्शन्स घ्यावी लागतात आणि त्यामुळे काही काळ शरीरात सूज येणे किंवा वजन वाढल्यासारखे वाटू शकते. त्यामुळे चित्रपटासाठी वजन वाढवण्याचा काळ आणि एग फ्रीझिंगची प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण करण्याचा निर्णय तिने घेतला. कृतिने सांगितले की, जर संधी असेल तर एग फ्रीझिंग हा स्वतःला दिलेला सर्वात मोठा आणि महत्त्वाचा भेटवस्तूसारखा निर्णय ठरू शकतो.




# इम्राम हाश्मी आणि दिशा पटानीची रोमँटिक कमेस्ट्री!

नुकताच अभिनेता इम्रान हाश्मीचा बहुप्रतीक्षित 'अवारापन २' चा टीझर रिलीज झाला आहे. या चित्रपटाची गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू असून, टीझरने चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. आता या चित्रपटाचं पहिलं गाण देखील रिलीज करण्यात आलं आहे. या गाण्याला चाहत्यांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. 'वे जुनून' या नावाने हे पहिलं गाणं रिलीज करण्यात आलं आहे. या चित्रपटात इम्रान हाश्मी आणि दिशा पटानी पहिल्यांदाच एकत्र दिसत असून दोघांची रोमँटिक केमेस्ट्री चर्चेचा विषय ठरत आहे. सय्यद कादरी यांनी या गाण्याचे गीतलेखन, सुबोध शर्मा यांनी गायन, तर मिथुन यांनी संगीत दिलं आहे. या गाण्यातून प्रेम, विरह आणि जुन्या आठवणींचा भावनिक प्रवास उलगडतो. इम्रानला दिशामध्ये आपल्या पहिल्या प्रेयसी आलियाची झलक दिसते आणि त्यानंतर त्यांच्या नात्याची सुरुवात होताना दाखवण्यात आली आहे. गाणं प्रदर्शित होताच सोशल मीडियावर चाहत्यांच्या भरभरून प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांनी श्रिया सरनच्या फ्लॅशबॅक सीन्सचं कौतुक केलं, तर काहींनी मूळ 'अवारापन' चित्रपटातील गाण्यांची आठवणही काढली आहे. २००७ मध्ये प्रदर्शित झालेला 'अवारापन' (Awarapan 2 ) सुरुवातीला बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला होता. मात्र, कालांतराने तो एक कल्ट क्लासिक चित्रपट ठरला आणि त्यातील गाणी आजही चाहत्यांच्या पसंतीस उतरतात. 'अवारापन २' चे दिग्दर्शन नितीन कक्कर यांनी केले असून, इम्रान हाश्मी, दिशा पटानी आणि शबाना आझमी प्रमुख भूमिकेत आहेत. हा चित्रपट १४ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातून इम्रानच्या जुन्या चित्रपटातील आठवणी पुन्हा पाहायला मिळणार असल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली आहे.

# तब्बू आणि नागार्जूनची जोडी तब्बल 28 वर्षानंतर एकत्र

अभिनेत्री तमिळ, स्टार अभिनेते वर्षानंतर ही जोडी भेटीला येण्याची बोललं जातं. याधीच्या यावेळी प्रेम नाही तर 100' चित्रपटाबद्दल मात्र, वृत्तांनुसार, तब्बू शकते. यापूर्वी एकत्र काम कपल म्हणून एकत्र येईल विरोधी भूमिकेत पाहायला बॅनरखाली बनत यांच्यासोबत सुष्मिता

तब्बूने आजपर्यंत अनेक मल्याळम, मराठी आणि नागार्जून यांच्यासोबत पुन्हा एकदा शक्यता भट्ट



चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारल्या आहेत. हिंदीसह इंग्रजी, तेलुगू, बंगाली चित्रपटांमध्येही तिने काम केलं आहे. तब्बूने १९९८ मध्ये साऊथ 'आविदा मां आविदे' या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. आता तब्बल 28 एकत्र पाहायला मिळणार आहे. 'किंग100' या चित्रपटातून ही जोडी प्रेक्षकांच्या आहे. परंतु, या चित्रपटात तब्बू खलनायिकेच्या भूमिकेत दिसणार असल्याचं चित्रपटात तब्बू-नागार्जुनचा लव्ह अँगल पाहायला मिळाला होता, पण दोघांमधील संघर्ष आणि वाद पाहायला मिळतील. दरम्यान, 'किंग निर्मात्यांनी अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. या चित्रपटात नकारात्मक भूमिकेत दिसू केल्यामुळे ही जोडी पुन्हा एकदा ऑनस्क्रिन अशी अनेकांना अपेक्षा होती. मात्र, यात दोघे मिळणार आहे. 'अन्नपूर्णा स्टुडिओज'च्या असलेल्या या चित्रपटात नागार्जुन आणि तब्बू देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.





# ख्रिस्तियानो रोनाल्डोला अश्रू अनावर

## FIFA विश्वचषक जिंकण्याचं स्वप्न भंगलं; स्पेनचा पोर्तुगालला पराभवाचा धक्का!

**महाईन्यूज | पोर्तुगल**

**फिफा विश्वचषकात ख्रिस्तियानो रोनाल्डोसाठी स्वप्नवत शेवट घडला नाही. स्पेनने अतिरिक्त वेळेत गोल करत पोर्तुगालला पराभवाचा दणका दिला आणि रोनाल्डोचं वर्ल्डकप विजयाचं स्वप्न अपूर्ण राहिलं. पोर्तुगालविरूद्ध स्पेनने एक्स्ट्रा टाईम गोल करत १-० असा थरारक विजय नोंदवला आहे. सबस्टीट्यूट म्हणून आलेल्या मायकेल मरीनो याने हा ऐतिहासिक गोल करत ख्रिस्तियानो रोनाल्डोचं फिफा विश्वचषक जिंकण्याचं स्वप्न धुळीस मिळवलं. या पराभवासह स्पेनचा संघ स्पर्धेबाहेर झाला आहे. ख्रिस्तियानो रोनाल्डोला या पराभवानंतर मैदानावर अश्रू अनावर झाले.**

संपूर्ण सामन्यात स्पेनने अधिक आक्रमक खेळ करत अनेक संधी निर्माण केल्या, मात्र पोर्तुगालचा गोलरक्षक डिओगो कोस्टाने एकापेक्षा एक सरस बचाव करत आपल्या संघाला शेवटपर्यंत सामन्यात टिकवून ठेवलं. सामन्याच्या अखेरच्या क्षणांत पोर्तुगालने बरोबरीचा गोल करण्यासाठी सर्वस्व पणाला लावलं. अगदी गोलरक्षक डिओगो कोस्टाही आक्रमणासाठी स्पेनच्या पेनल्टी क्षेत्रात पोहोचला होता. मात्र, स्पेनच्या भक्कम बचावफळीने कोणतीही संधी न देता विजयावर शिक्कामोर्तब केलं.

या पराभवासह ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या विश्वचषक कारकिर्दीचा भावनिक शेवट झाला. दुसरीकडे, युवा स्टार लामिन यामालच्या स्पेनने पुढील फेरीत प्रवेश करत फुटबॉलमधील सर्वात मोठ्या किताबाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचं पाऊल टाकलं.

लामिन यामालसाठीही पोर्तुगालविरुद्धच्या लढतीच्या काही कटू आठवणी होत्या. गेल्यावर्षी झालेल्या यूईएफए नेशन्स लीगच्या अंतिम सामन्यात स्पेनला पेनल्टी शूटआऊटमध्ये पोर्तुगालकडून पराभव स्वीकारावा लागला होता. त्यामुळे त्या पराभवाची परतफेड करण्याची संधी यामाल आणि स्पेनसमोर होती. विशेष म्हणजे, विश्वचषकात २०१८ नंतर प्रथमच स्पेन आणि पोर्तुगाल आमनेसामने आले. रशियात झालेल्या त्या सामन्यात ख्रिस्तियानो रोनाल्डोने हॅट्ट्रिक करत स्पेनच्या हातातून सामना हिसकावून घेतला होता आणि अखेर तो सामना ३-३ असा बरोबरीत संपला होता.

आयबेरियन डर्बी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या लढतीकडे फुटबॉल चाहत्यांचं विशेष लक्ष होतं. दोन्ही संघांकडे जागतिक दर्जाचे अनेक स्टार खेळाडू असून विशेषतः मध्यफळीतील ताकद ही सामन्याचं मुख्य आकर्षण होती. पोर्तुगालकडे ब्रुनो फर्नांडिस, विटिन्हा आणि जोआओ नेव्हेस यांसारखे दमदार खेळाडू होते, तर स्पेनकडे पेद्री, रोड्री आणि दानी ओल्मो यांसारखी स्टार्सची फळी सज्ज होती. त्यामुळे या महासंग्रामाकडून चाहत्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. त्याचप्रमाणे अतिरिक्त वेळेत जात झालेल्या गोलमुळे हा सामना अधिक थरारक ठरला.



# झिम्बाब्वेचा दौरा, घाऊक पदार्पणं आणि स्वप्नपूर्तीची संधी

**महाईन्यूज | न्यूयॉर्क**

**झिम्बाब्वे संघाची रया गेल्यापासून भारतीय संघ या दौऱ्याचा उपयोग अनेक नव्या खेळाडूंना पदार्पण देण्यासाठी करत आहे. झिम्बाब्वे दौरा म्हणजे घाऊक पदार्पणं असंच समीकरण झालं आहे. टी२० क्रिकेटमध्ये स्वत:च्या नावाचा दबदबा करणारे असंख्य भारतीय खेळाडूंनी झिम्बाब्वेत पदार्पण केलं आहे. या महिन्यात पुन्हा एकदा भारतीय संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर जात आहे. या दौऱ्यात प्रभसिमरन सिंग, हर्ष दुबे, अशोक शर्मा, यश ठाकूर यांचं टी२० पदार्पण होऊ शकतं. प्रभसिमरन सिंगने यंदाच्या आयपीएल हंगामात खोऱ्याने धावा केल्या. हर्ष दुबे डोमेस्टिक क्रिकेटमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करतो आहे. अशोक शर्माने आपल्या वेगाने सगळ्यांना प्रभावित केलं आहे.**



भारतीय संघाचं रनमशीन विराट कोहलीचं टी२० पदार्पण अशाच एका झिम्बाब्वे दौऱ्यादरम्यान झालं. आपल्या फिरकीने भल्याभल्या फलंदाजांना बुचकळ्यात टाकणारे रवीचंद्रन अश्विन आणि युझवेंद्र चहल यांच्या टी२० कारकिर्दीची सुरुवात हरारे स्पोर्ट्स क्लब इथूनच झाली. भारतीय संघाचा तिन्ही प्रकारातला भरवशाचा फलंदाज केएल राहुलने आपल्या वनडे कारकिर्दीची सुरुवात झिम्बाब्वे दौऱ्यातूनच केली. राहुलने पर्दापणाच्या लढतीतच शतकी खेळी साकारण्याचा विक्रम नावावर केला. २०२६ टी२० वर्ल्डकप स्पर्धेत मालिकावीराचा मानकरी ठरलेल्या संजूने टी२० प्रकारात झिम्बाब्वेतच पहिलं पाऊल ठेवलं. डोमेस्टिक क्रिकेटमध्ये धावांची टांकसाळ उघडणारा डावखुरा शैलीदार फलंदाज फैझ फझलला झिम्बाब्वे दौऱ्यातच भारतासाठी खेळायची संधी मिळाली. फझलने अर्धशतकासह चांगली सुरुवात केली मात्र प्रमुख खेळाडू संघात परतल्यानंतर फझलला पुन्हा भारतीय संघात स्थान मिळालं नाही.

भारतीय संघाचा तारणहार अक्षर पटेलची सुरुवातही हरारेतूनच झाली आहे. मुंबईकर धवल कुलकर्णी आणि तुषार देशपांडे यांचं भारतासाठी खेळायचं स्वप्न याच भूमीत पूर्ण झालं. कसोटीत टीम इंडियाची नवी वॉल असणाऱ्या चेतेश्वर पुजाराने वनडेत मापटं ओलांडलं ते झिमाब्बे दौऱ्यातच. दुर्दैवाने चेतेश्वरला वनडे संघात फारशी संधीच मिळाली नाही. भारतीय संघात पुन्हा संधी मिळावी यासाठी परमेश्वराकडे धावा करणाऱ्या करुण नायरला पहिली संधी झिम्बाब्वे दौऱ्याद्वारेच मिळाली होती. कारकिर्दीत असंख्य दुखापतींचा सामना करत छाप उमटवण्याचं काम आशिष नेहराने केलं. निवृत्त झाल्यानंतर देशी स्टाईलचे प्रशिक्षक म्हणून त्यांनी नावलौकिक कमावला. नेहराच्या वनडे आणि कसोटी अशा दोन्ही कारकिर्दीची सुरुवात झिम्बाब्वेमध्येच झाली.

२०१६ मध्ये झिमाब्बे दौऱ्यात भारतीय संघव्यवस्थापनाने पंजाबच्या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला पदार्पण देण्याचा निर्णय घेतला. त्याचं नाव होतं बरिंदर स्राण. बरिंदरने ४ षटकात अवघ्या १० धावा देत ४ विकेट्स पटकावण्याची किमया केली. बरिंदरला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. पदार्पणाच्या लढतीतच सामनावीराचा पुरस्कार पटकावणाऱ्या मोजक्या खेळाडूंमध्ये बरिंदरचं नाव सामील झालं. दुर्दैवाने बरिंदरला नंतर फार संधी मिळाल्या नाहीत.

भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी प्रचंड चुरस असते. डोमेस्टिक क्रिकेटमध्ये ३८ संघ खेळतात. प्रत्येक संघात किमान १५ ते २० खेळाडू. या सगळ्यांमधून १५ सदस्यीय संघात स्थान मिळवण्यासाठी उत्कृष्ट फिटनेस, सातत्यपूर्ण कामगिरी आणि नशीबही लागतं. नव्वदीच्या दशकात झिम्बाब्वेचा संघ तुल्यबळ होता. झिम्बाब्वेचा तो संघ भारतात येऊन भारताला टक्कर देत असे. बदलत्या सामाजिक राजकीय परिस्थितीमुळे झिम्बाब्वे संघाची रयाच गेली. यामुळे झिम्बाब्वे दौऱ्याचा उपयोग नव्या खेळाडूंना संधी देण्यासाठी होऊ लागला. इंडिया ए तसंच उदयोन्मुख संघांचा नियमित भाग असलेले, डोमेस्टिक क्रिकेटमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना या दौऱ्याच्या माध्यमातून संधी मिळू लागली. प्रमुख खेळाडू संघात असताना या खेळाडूंना राखीवमध्येच बसावं लागतं. झिम्बाब्वे दौऱ्याच्या निमित्ताने या मंडळींचं भारतीय संघासाठी खेळण्याचं स्वप्न साकार होऊ लागलं.

DYP
Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX
AKURDI, PUNE

43 Years of Excellence in Education

# Your Pathway to Leadership Begins at D Y PATIL

## ADMISSIONS OPEN 2026-27

## Our Institutes

**COLLEGE OF ENGINEERING** (AUTONOMOUS)
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & **NBA** NRI Quota Available
UC- Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A
PG- Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A
PhD- Mech / ENTC / Civil

**INSTITUTE OF MCA & MANAGEMENT**
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Affiliated to SPPU
MCA / MBA / PhD (Management)

**COLLEGE OF ARCHITECTURE**
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Approved by COA
B.Arch / M.Arch (Construction Management) / D.Arch

**PGDM INSTITUTE**
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
NRI Quota Avaliable
Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics & Business Analytics with AI / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management

**COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT**
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
BSc (Hons) Agri Business Management

**COLLEGE OF PHARMACY**
Accredited by **NBA** & **NAAC** with **'A+'** Grade
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
D.Pharm / B.Pharm / Pharm D. / M.Pharm (Pharmaceutics) / M.Pharm (Pharmaceutical Quality Assurance) / M.Pharm (Pharmaceutical Chemistry) / M.Pharm (Pharmacology) / M.Pharm (Regulatory Affairs) / M.Pharm (Phytopharmacy & Phytomedicine)

**INSTITUTE OF PHARMACY**
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
D.Pharm

**Y B PATIL POLYTECHNIC**
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
(Accredited by **NBA**)
Diploma in Civil / Mech / Comp / E&C

## Why Choose Us?

- Green & Modern Campus
- Smart Classrooms & Digital Learning
- Experienced Faculty & Excellence
- Global University Collaborations
- Wi-Fi Campus & Modern Facilities
- Sports, Cafeteria & Auditorium
- Safe & Disciplined Environment
- International Academic Tours
- Modern Boys & Girls Hostels
- DYP Dnyansagar Incubation Foundation



**Address:** Sector No. 29, Nigdi Pradhikaran, Akurdi, Pune 411044, Maharashtra, India
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

# आरोग्य समितीला ५० लाखांपर्यंत निर्णयाचे अधिकार!

## पिंपरी-चिंचवड महापालिका सर्वसाधारण सभेत मान्यतेची प्रतिक्षा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आरोग्य व वैद्यकीय समितीला ५० लाख रुपयांपर्यंतच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार देण्याचा प्रस्ताव येत्या १५ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे.**



महापालिका सभेने ५ मे २०२६ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३०(१) अन्वये आरोग्य व वैद्यकीय समिती या विशेष समितीच्या स्थापनेस मान्यता दिली होती. आता या समितीचे कामकाजाचे क्षेत्र, अधिकार व कर्तव्ये निश्चित करण्यासह आर्थिक अधिकार देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला आहे.


प्रस्तावानुसार, आरोग्य व वैद्यकीय समितीला १० लाख रुपयांपेक्षा अधिक आणि ५० लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात येणार आहे. तसेच ५० लाख रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या प्रस्तावांबाबत महापालिका सभेकडे शिफारस करण्याचे अधिकार समितीला देण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे आरोग्य विभागातील विविध विकासकामे, वैद्यकीय सुविधा, उपकरणांची खरेदी, रुग्णालयांशी संबंधित कामे आणि नागरिकांच्या आरोग्याशी निगडित प्रस्तावांवर अधिक वेगाने निर्णय घेणे शक्य होणार आहे. सध्याच्या प्रशासकीय प्रक्रियेमध्ये लागणारा वेळ कमी होऊन आरोग्यविषयक कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या विषयासंदर्भात नगरसेवक कुशाग्र कदम आणि ज्ञानेश्वर जगताप यांनी प्रस्ताव सादर केला असून, विधी समितीने ६ जुलै २०२६ रोजीच्या ठराव क्रमांक १४ द्वारे त्यास मान्यता दिली आहे. त्यानंतर आता हा विषय अंतिम मंजुरीसाठी १५ जुलै रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे, आरोग्य व वैद्यकीय समिती स्थापन करण्याची संकल्पना शहर सुधारणा समितीचे सदस्य तथा डॉ. सुहास कांबळे यांनी मांडली होती. शहराची वाढती लोकसंख्या आणि नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन आरोग्य क्षेत्रासाठी स्वतंत्र निर्णयक्षम समितीची आवश्यकता त्यांनी मांडली होती. त्यांच्या या संकल्पनेला महापालिकेने मान्यता दिल्यानंतर आता समितीला आर्थिक अधिकार देण्याच्या प्रक्रियेलाही वेग आला आहे.

आरोग्य क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेला संस्थात्मक स्वरूप देण्यासाठी ही समिती महत्त्वाची ठरणार असून, पिंपरी-चिंचवड शहरातील आरोग्य सुविधा अधिक प्रभावी करण्यासाठी तिची भूमिका निर्णायक राहणार आहे.



“ पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि प्रभावी आरोग्य सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने आरोग्य व वैद्यकीय समितीची संकल्पना मांडण्यात आली होती. या संकल्पनेला आमदार महेश लांडगे यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले आहे.
आरोग्य क्षेत्रातील निर्णय प्रक्रिया अधिक गतिमान व्हावी, तातडीच्या कामांना वेग मिळावा आणि महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेला अधिक सक्षम करता यावे, हा या समिती स्थापनेमागील मुख्य हेतू आहे. समितीला ५० लाख रुपयांपर्यंतच्या प्रस्तावांवर निर्णय घेण्याचे अधिकार मिळाल्यानंतर आरोग्यविषयक कामांना निश्चितच गती मिळेल. रुग्णालये, वैद्यकीय सुविधा, उपकरणांची उपलब्धता आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी ही समिती महत्त्वाची भूमिका बजावेल. शहराच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने हे महत्त्वाचे पाऊल पुढे जात आहे.

**- डॉ. सुहास कांबळे, सदस्य, शहर सुधारणा समिती.**

# स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी वाचवले २०० हून अधिक जीव!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला झोडपून काढणाऱ्या मुसळधार पावसामुळे थेरगाव आणि चिंचवड परिसरात जनजीवन विस्कळीत झाले आहे. सखल भागांत पाणी साचल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली आहे. अशा कठीण परिस्थितीत, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून युद्धपातळीवर बचाव कार्य हाती घेतले आहे.**






### प्रशासन ‘हाय-अलर्ट’वर

चिंचवड गाव आणि थेरगाव परिसरातील पावसाची स्थिती पाहता, सर्व संबंधित शासकीय यंत्रणांना ‘हाय-अलर्ट’वर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सभापती अभिषेक बारणे यांनी प्रत्यक्ष परिस्थितीवर लक्ष केंद्रित केले असून, “नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे,” असे आवाहन त्यांनी केले आहे. अभिषेक बारणे यांच्या या कार्यतत्परतेमुळे परिसरात समाधान व्यक्त केले जात असून, संकटकाळात जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या नेतृत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

चिंचवडगाव परिसरातील भागात पाणी वेगाने वाढल्याने पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या ‘पुनरुत्थान समरसता गुरुकुलम’ मधील लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सभापती अभिषेक बारणे यांनी तातडीने धाव घेतली. पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्याशी चर्चा करून आणि आपल्या यंत्रणेला सोबत घेऊन, त्यांनी गुरुकुलममधील सर्व मुलांना सुखरूप बाहेर काढले आणि त्यांना सुरक्षित स्थळी हलवले. सभापतींच्या या तत्परतेमुळे एक मोठी दुर्घटना टळली.

केवळ मानवी जीवच नव्हे, तर मुक्या जनावरांच्या सुरक्षेसाठीही त्यांनी मोठी कामगिरी बजावली. गुरुकुलमधील गोठ्यांमध्ये पाणी शिरल्याने २०० हून अधिक गायी अडकून पडल्या होत्या. अभिषेक बारणे यांनी स्वतः या बचाव कार्यात पुढाकार घेत या सर्व गायींना सुरक्षित स्थानी हलवले. त्यांच्या या धाडसी कार्याचे पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनीही कौतुक केले असून, संकटकाळात प्रशासकीय प्रतिनिधीने दाखवलेली ही संवेदनशीलता दिलासादायक असल्याचे मत व्यक्त केले.

# १५ टक्के पाणीकपात तातडीने रद्द करा!

## भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची आयुक्तांकडे मागणी : निर्णयाकडे लक्ष

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मावळ परिसरासह पवना धरण क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील जलसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात लागू करण्यात आलेली १५ टक्के पाणीकपात तातडीने रद्द करून नागरिकांना पूर्ववत पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा सुरू करावा, अशी ठाम मागणी भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.**





निवेदनात काटे यांनी नमूद केले आहे की, यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झाल्यामुळे पवना धरणातील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला होता. उपलब्ध जलसाठा अधिक काळ पुरावा, या उद्देशाने महापालिकेने शहरात १५ टक्के पाणीकपात लागू केली होती. त्या निर्णयाला जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून सहकार्य करत नागरिकांनाही संयम बाळगण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मात्र, गेल्या चार ते पाच दिवसांपासून मावळ तालुक्यासह धरण क्षेत्रात मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे पवना धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू असून जलसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता पाणीकपात कायम ठेवण्याचे कोणतेही कारण उरले नसल्याचे काटे यांनी निवेदनात म्हटले आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये आणि गृहनिर्माण संस्थांमध्ये अद्यापही कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. धरणात पाणीसाठा वाढत असताना शहरवासीयांना पाणीकपातीचा फटका बसणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धरणातील वाढता जलसाठा आणि सुरू असलेली पाण्याची आवक लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने १५ टक्के पाणीकपात तातडीने रद्द करावी, तसेच पिंपरी-चिंचवडमधील सर्व नागरिकांना पूर्ववत, नियमित आणि पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा सुरू करून दिलासा द्यावा, अशी मागणी काटे यांनी केली आहे.

दरम्यान, या निवेदनानंतर महापालिका प्रशासन पाणीकपातीबाबत कोणता निर्णय घेते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# क्रीडा विभाग होणार 'क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन विकास व सांस्कृतिक विभाग'

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन आणि सांस्कृतिक क्षेत्रांना एकत्रित व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने क्रीडा विभागाचे नामकरण 'क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन विकास व सांस्कृतिक विभाग' असे करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव महापालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे.**




> पिंपरी चिंचवड शहराचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन आणि सांस्कृतिक जडणघडणीशीही जोडलेला आहे. शहरातील गुणवंत खेळाडू, कलाकार, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिभांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी सर्व क्षेत्रांचा एकत्रित आणि नियोजनबद्ध विकास होणे आवश्यक आहे. क्रीडा विभागाचे 'क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन विकास व सांस्कृतिक विभाग' असे नामकरण केल्यामुळे या सर्व क्षेत्रांसाठी व्यापक धोरण आखणे, विविध उपक्रमांना चालना देणे आणि प्रशासनामध्ये अधिक सुसूत्रता आणणे शक्य होईल. पिंपरी चिंचवडला क्रीडा, कला आणि संस्कृतीची समृद्ध ओळख निर्माण करून देण्याचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.
>
> **– योगेश लांडगे, नगरसेवक तथा सदस्य, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती.**

नगरसेवक तथा क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य योगेश लांडगे यांनी या विषयासाठी पुढाकार घेतला असून, शहराच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासाला गती देण्यासाठी स्वतंत्र आणि व्यापक धोरणाची आवश्यकता असल्याचे त्यांनी मांडले आहे.

शहरातील क्रीडा उपक्रमांसोबतच संगीत, साहित्य, ग्रंथालये, स्पर्धा परीक्षा केंद्रे, अभ्यासिका, पर्यटनस्थळे आणि सांस्कृतिक केंद्रे यांचा समन्वय साधून एकात्मिक विकास साधणे गरजेचे आहे. सध्या क्रीडा विभागाच्या कार्यक्षेत्रात विविध कला, साहित्य व सांस्कृतिक उपक्रमांशी संबंधित आस्थापनांचा समावेश आहे. त्यामुळे या सर्व क्षेत्रांना एकत्रित स्वरूप देण्यासाठी विभागाचे नामकरण बदलण्याचा प्रस्ताव करण्यात आला आहे.या प्रस्तावानुसार शहरातील क्रांतिवीर चापेकर वाडा, महानगरपालिकेची प्रेक्षागृहे व नाट्यगृहे, पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी, सार्वजनिक ग्रंथालये, स्पर्धा परीक्षा केंद्रे आणि अभ्यासिका यांसारख्या संस्थांच्या कामकाजाला अधिक व्यापक दिशा मिळणार आहे.

योगेश लांडगे यांनी सांगितले की, "पिंपरी चिंचवड शहराचा विकास केवळ भौतिक सुविधांपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक गरजांची पूर्तता करणारा असणे आवश्यक आहे. सर्व संबंधित क्षेत्रांसाठी एकसंध धोरण तयार केल्यास शहरातील प्रतिभांना मोठी संधी उपलब्ध होईल."

क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन व सांस्कृतिक क्षेत्रांना प्रोत्साहन देणे, प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणणे आणि या क्षेत्रांचा समन्वित विकास साधणे हा या प्रस्तावामागील मुख्य उद्देश आहे. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या ठरावानंतर आता हा विषय महापालिका सर्वसाधारण सभेत अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात आला असून, सभेच्या निर्णयाकडे शहरातील सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# भक्ती विठ्ठलाची... सेवा आरोग्याची!

## लाखो वारकऱ्यांच्या आरोग्यरक्षणासाठी सज्ज आरोग्य यंत्रणा

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**आषाढी वारी म्हणजे केवळ श्रद्धेचा महासागर नाही, तर लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची जबाबदारीही तितकीच मोठी असते. ऊन, पाऊस, लांबचा पायी प्रवास, बदलते हवामान आणि मोठी गर्दी या सर्व आव्हानांमध्ये प्रत्येक वारकरी सुरक्षित आणि निरोगी राहावा, यासाठी यंदाच्या पालखी सोहळा २०२६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने "भक्ती विठ्ठलाची, सेवा आरोग्याची" हे ब्रीदवाक्य स्वीकारत अत्यंत व्यापक आणि नियोजनबद्ध व्यवस्था उभी केली आहे. आज श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीत सेवा सुरु करण्यात आली आहे.**




७ जुलै ते २९ जुलै या संपूर्ण वारी कालावधीत पालखी मार्गावरील प्रत्येक टप्प्यावर वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहेत. तब्बल १९२ वैद्यकीय सेवा पथके, १३३ वैद्यकीय अधिकारी, ३७८ आरोग्य कर्मचारी, ३२ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ४४ आरोग्य उपकेंद्रे वारकऱ्यांच्या सेवेत कार्यरत राहतील. एवढेच नव्हे, तर दर दोन किलोमीटरवर रुग्णवाहिका पथके तैनात करण्यात आली असून पालखीसोबत सुरुवातीपासून परतीच्या प्रवासापर्यंत २४ तास कार्यरत सहा फिरती वैद्यकीय पथके सतत सेवेत असतील.

गंभीर परिस्थितीत तातडीने उपचार मिळावेत यासाठी १७६ रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये १०८ आपत्कालीन सेवेंतील ALS आणि BLS रुग्णवाहिका तसेच १०२ सेवेंतील रुग्णवाहिका समाविष्ट आहेत. त्यामुळे कोणत्याही वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देणे शक्य होणार आहे.

वारीत सहभागी होणाऱ्या दिंडी प्रमुखांना ४,५०० औषध किट देण्यात येणार आहेत. ताप, वेदना, पोटाचे विकार, ॲलर्जी, निर्जलीकरण आणि किरकोळ जखमांवर प्राथमिक उपचार करता यावेत, यासाठी पॅरासिटामॉल, डायक्लोफेनाक, मेट्रोनिडाझोल, सेंट्रिझिन, ओआरएस, मलम आणि पट्ट्यांचा समावेश या किटमध्ये करण्यात आला आहे.

महिला आणि बालकांच्या गरजांचा विशेष विचार करत पालखी मार्गावर १५ निवारा केंद्रे उभारण्यात आली आहेत. येथे विश्रांती, औषधोपचार, तज्ज्ञ डॉक्टर आणि रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध असेल. त्याचबरोबर स्तनदा माता आणि बालकांसाठी १२ हिरकणी कक्ष सुरू करण्यात आले असून, स्वतंत्र विश्रांती व्यवस्था, वैद्यकीय सेवा आणि बालकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

आरोग्यदायी वारीसाठी शुद्ध पाणी हा महत्त्वाचा घटक मानत आरोग्य आणि पाणीपुरवठा विभागाने विशेष खबरदारी घेतली आहे. २०० पाण्याचे टँकर्स आणि ९८ फिलिंग पॉईंट्स कार्यरत राहतील. प्रत्येक टँकरची पाणी गुणवत्ता तपासल्यानंतरच तो पुढे पाठवला जाणार असून, खाजगी टँकर्सच्या तपासणीसाठी दर पाच किलोमीटरवर स्वतंत्र तपासणी केंद्रे उभारण्यात आली आहेत. जलजन्य आजारांना प्रतिबंध करण्यासाठी ही व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे.

वारीदरम्यान अन्नातून होणारे आजार टाळण्यासाठी पालखी मार्गावरील हॉटेल्स, ढाबे आणि उपहारगृहांची नियमित तपासणी केली जाणार आहे. उघडे, शिळे अथवा नासलेले अन्न विक्रीस प्रतिबंध करण्यात आला असून, अन्न हाताळणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणीही बंधनकारक करण्यात आली आहे.

यंदाच्या नियोजनातील आणखी एक दूरदृष्टीचा निर्णय म्हणजे "आषाढी पालखी विकास आराखडा". ग्रामीण भागातील गंभीर रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी पालखी मार्गावरील निवडक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कायमस्वरूपी अतिदक्षता विभाग स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. वारीपुरती मर्यादित न राहता ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला दीर्घकालीन बळ देणारे हे पाऊल ठरणार आहे.

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या अध्यात्माची ओळख आहे. या अध्यात्माच्या प्रवासात लाखो वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा मानत महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने उभारलेली ही सर्वसमावेशक यंत्रणा म्हणजे सेवा, संवेदनशीलता आणि सुयोग्य नियोजनाचा आदर्श आहे. विठ्ठलाच्या नामस्मरणाबरोबरच प्रत्येक वारकरी सुरक्षित, निरोगी आणि आनंदाने पंढरीची वाट चालू शकेल, यासाठी आरोग्य विभागाची ही सज्जता वारीच्या व्यवस्थापनातील एक महत्त्वाचा आणि प्रेरणादायी अध्याय ठरत आहे.

# जूनमध्ये पिंपरी चिंचवडमध्ये तब्बल ४७ हजार ७६६ टन कचऱ्याचे संकलन

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून जून महिन्यात शहरातून एकूण तब्बल ४७ हजार ७६६.७८५ टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले आहे. स्त्रोत पातळीवर कचऱ्याचे विलगीकरण, स्वतंत्र संकलन आणि वैज्ञानिक प्रक्रियेला दिलेल्या प्राधान्यामुळे शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक परिणामकारक होत असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले.**




> स्वच्छ शहराची सुरुवात प्रत्येक घरातून होते. नागरिकांनी घरच्या घरी ओला व सुका कचरा विलग करून महापालिकेला सहकार्य केल्यास कचऱ्याचे पुनर्चक्रण अधिक प्रभावीपणे करता येते. स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक पिंपरी चिंचवड घडविण्यासाठी नागरिकांचा सहभाग हीच सर्वात मोठी ताकद आहे. प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरणाची सवय अंगीकारून 'झिरो वेस्ट सिटी'च्या संकल्पनेला बळ द्यावे.
>
> **- रवी लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**



महापालिकेच्या आकडेवारीनुसार, जून महिन्यात ३५ हजार २३.६०० टन सुका कचरा, ६ हजार ७३१.३२० टन ओला कचरा, ४ हजार ९७.८५० टन मिश्र कचरा, १ हजार ११८.२२५ टन ग्रीन वेस्ट, ४७९.२२५ टन चिकन वेस्ट आणि ३१६.५६५ टन मंडई वेस्ट संकलित करण्यात आला. संकलित कचऱ्यावर विविध प्रक्रिया केंद्रांमध्ये वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करून पुनर्चक्रीकरण तसेच वसुंधरापूरक व्यवस्थापन करण्यात येत आहे. त्यामुळे लँडफिलवरील ताण कमी होण्यासह नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनालाही चालना मिळत आहे.

महापालिकेने घराघरांतून ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्यासाठी सातत्याने जनजागृती मोहीम राबविली आहे. त्याला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, कचरा विलगीकरणाचे प्रमाण वाढल्याने कचऱ्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि प्रभावी होत आहे. त्याचबरोबर ग्रीन वेस्ट, मंडई वेस्ट आणि इतर विशेष प्रकारच्या कचऱ्याचे स्वतंत्र संकलन केल्यामुळे पर्यावरणपूरक घनकचरा व्यवस्थापनाला बळ मिळत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, "घनकचरा व्यवस्थापन ही केवळ स्वच्छतेची बाब नसून पर्यावरण संवर्धनाशी निगडित महत्त्वाची जबाबदारी आहे. पिंपरी चिंचवडमध्ये कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्चक्रण आणि वैज्ञानिक प्रक्रिया यावर सातत्याने भर दिला जात आहे. नागरिकांनी कचरा विलगीकरणाची सवय अधिक प्रभावीपणे अंगीकारल्यास 'झिरो वेस्ट सिटी'चे उद्दिष्ट निश्चितपणे साध्य होईल आणि भावी पिढ्यांसाठी अधिक स्वच्छ व हरित शहर निर्माण करता येईल.

महापालिकेने नागरिकांना घरातूनच ओला, सुका तसेच सॅनिटरी कचरा, विशेष काळजी योग्य कचरा अशा चार प्रकारे कचरा विलग करूनच महापालिकेच्या घंटागाडीत देण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि महापालिकेच्या प्रभावी उपाययोजनांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ, हरित आणि शाश्वत शहर घडविण्याच्या दिशेने सातत्याने प्रगती करत असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.